# ट्रेलर

**-- चं.प्र.देशपांडे.**

१ : तुझ्या पायाला काहीतरी झालंय. तुला स्थिर उभं राहता येत नाहीय.

२ : माझ्या पायाला न्यूमोनिया झाला आहे.

१ : पायाला न्यूमोनिया कसा होईल ? तो डोक्याला होतो.

२ : मग काय ?

१ : तुझ्या पायाला पायोरिया झाला असेल.

२ : पण पायाला काहीतरी झालेलं आहेच का ?

१ : निश्चित. इतक्या ताणांच्या या भयानक जगात कुठेच काहीच न झालेला माणूस कसा असू शकेल ? तुझ्या बाबतीत पायच असणार. तू स्थिर उभं राह्यचा प्रयत्न कर.

२ : तोच प्रयत्न चालू आहे माझा.

१ : मन शांत ठेव, म्हणजे यशस्वी होशील.

२ : तू यशस्वी झाला आहेस ?

१. : स्थिर उभं राहण्यात तरी ! आता तू सारखा हलतो आहेस म्हणून मलाही हलावं लागतंय.

२ : स्थिर उभं राहण्याचं एवढं काय महत्त्व आहे ?

१ : स्थिर उभं राहण्यात आपला फायदा असतो.

२ : कोणता ?

१ : त्यामुळं अस्थिरता कमी जाणवते.

२ : मला कंटाळा आला. हे ऐकून ऐकून.

१ : सारखा हलू नकोस. माझे पाय दुखायला लागले. तुझ्यामुळं मला स्थिर उभं राहणं कठीण जातंय.

२ : मला एखादी मैत्रीण हवी आहे.

१ : कशाला ?

२ : मला मैत्रीण मिळाली तर मी स्थिरावू शकेन.

१ : ते कसं ?

२ : तू कसा माझ्यामुळं हलतो आहेस, तसा तिच्यामुळं मी स्थिर होईन.

१ : म्हणजे ती स्वतः स्थिर हवी. चंचल असून चालणार नाही.

२ : कशीही असली तरी मी तिला खिळवून ठेवीन.

१ : खिळवून ?

२ : होय. खिळवून.

१ : ते कसं ?

२ : मैत्रीण येऊ दे, मग पाहशीलच तू.

१ : तुला कुणी मैत्रीण मिळेलसं वाटत नाही मला !

२ : का ?

१ : मैत्रीण मिळवायला धाडस लागतं. निःसंकोचपणे कुठल्याही मुलीशी बोलायची तयारी लागते.

२ : आणखीन ?

१ : लोक काय म्हणतात याकडे दुर्लक्ष करावं लागतं. अपयशाची लाजलज्जा सोडावी लागते. आणि प्रत्येक मुलीकडे आपण भीक मागतोय असं चित्र न दिसता आपला प्रत्येक मुलीवर प्रेमाचा हक्कच आहे अशी भावना मुळात असावी लागते. पुरुषानं निधड्या हक्कानं जवळ येणं स्त्रीला आवडतं, पण त्यातही मानसिक दर्जा जवळपास सारखा असावा लागतो. गरिबी श्रीमंतीचा प्रश्न नाही.

२ : तुला किती मैत्रिणी आहेत ?

१ : मला या गोष्टींची उघड चर्चा करायची गरज नाही. मैत्रीण तुला हवी आहे असं तू उघडपणे कबूल केलं आहेस.

२ : इतक्या प्रचंड लोकसंख्येच्या देशात माझ्यासारख्या होतकरू तरुणाला साधी एक मैत्रीण मिळू शकत नाही ही अगदी लाजिरवाणी परिस्थिती आहे.

१ : ही लाजीरवाणी परिस्थिती आहे, पण देशाला नाही - तुला. देश मोठा आहे. आणि तो आणखी मोठा

होतो आहे.

२ : मोठा ? मोठा होतो आहे ?

१ : होय. मी सध्या त्याच गडबडीत आहे. त्यात आणखी सतत हलत राहात तुझ्याशी बोलण्याचे हे श्रम ! तू निदान जरा स्थिर तरी उभा राहा.

२ : देश कसा काय मोठा होतो आहे ? कुणी सांगितलं तुला हे ?

१ : आता सुरुवातीला ही एक गुप्त बातमी होती. काही मोजक्याच लोकांना हे माहीत होतं, परंतू हळूहळू आता हे जवळजवळ सगळ्यांना माहीत झालेलं आहे. जवळजवळ म्हणायचं कारण इतकंच की हे तुला माहिती दिसत नाहीय.

२ : काय ते ? देश मोठा होण्याचं ?

१ : हं, तर झालंय काय की अरबी समुद्र हळूहळू खाली ओसरत चाललाय आणि हा ओसरण्याचा वेगही वाढत चाललाय आता. सगळं पाणी हिंदी महासागरात सामावलं जातंय, प्रचंड उलथापालथ होतीय. त्यामुळं अर्थातच मधला भूभाग उघडा होणार आहे. आणि ही जी एवढी मोठी जमीन उघडी होणार आहे तिच्यातला जास्तीत जास्त भाग मिळवण्यासाठी इराण, पाकिस्तान, भारत वगैरे देश जोरदार प्रयत्न करणार आहेत. सगळ्यांनी आपापल्या लष्करांना जय्यत तयारीत राहण्याचे आदेश दिलेले आहेत. शेकडो किलोमीटर मिळवण्याचा किंवा घालवण्याचा प्रश्न आहे.

२ : पण एखादं आंतरराष्ट्रीय समजूतदार मंडळ या जमिनीचं वाटप करू शकणार नाही ? इतका आटापिटा कशाला करायचा ?

१ : ते तर करावंच लागेल. पण अशा आंतरराष्ट्रीय समजूतदार मंडळाची बैठक सुरू होण्यापूर्वी जास्तीत जास्त भूभागावर आपला ताबा घेऊन ठेवलाच पाहिजे; म्हणजे वाटाघाटीत आपल्याला जरा वरचढ राहता येतं.

२ : पण ही काही सपाट जमीन नसणार. हा भूभाग वर येताना डोंगर,दऱ्या,पाणवनस्पतींची रानंवनं सगळं असणार. यावर ताबा कसा मिळवणार झटकन ?

१ : ( ह्या खुळ्या प्रश्नाला हसून )

डोंगर रानं पाण्यात
पाणी डोंगर रानांत

( नाचत गाणे म्हणू लागतो. त्यात २ ही सामील होतो.)

२ : ( जरा वेळाने ) थांब, माझ्या प्रश्नाचं उत्तर राहिलंच. कसा काय मिळवणार ताबा ?

१ : विमानं, बुलडोझर, रणगाडे इत्यादी अनेक गोष्टी वापराव्या लागतील. ते जाऊ दे. कुठलीच किरकोळ गोष्टही तुझी तुला कळणार नाही असं दिसतंय ! सगळं समजावून सांगायचा मला कंटाळा येतो. आता जरा वेळ तुझी ही अस्थिरता माझ्यापुढे आणू नकोस. मला जरा विश्रांती घेतली पाहिजे. नंतर खूप कामं आहेत मला. देशाचा प्रश्न आहे. ( बाजूला जाऊन बसतो. २ तसाच अस्थिर उभा. मग जरा वेळाने २ हा १ पुढे येतो.)

१ : माझ्यासमोर येऊ नकोस म्हटलं ना ? माझी स्थिरता आणि शांतता ढळते तुझ्यामुळे

२ : होय, पण --

१ : बरं, राहू दे. मी जातोच.

( जायला निघतो. एवढ्यात डावीकडून एक मोर्चा येतो. मोर्चा एकच आहे. पण त्यात वेगवेगळे गट आहेत.)

गट अ : ए एन टी यू -- झिंदाबाद !

ब पी टी एम एन -- झिंदाबाद !

क : वाय टी ओ टी -- झिंदाबाद !

ड : डब्ल्यू आय डब्ल्यू डब्ल्यू -- झिंदाबाद !

( प्रत्येक गट आपापल्या घोषणा जोरात देत राहतो. अ, ब, क यांच्या वेळी सगळे " झिंदाबाद " म्हणतात. पण ड च्या वेळी अ गप्प. शेवटचा ड गट जास्त जोरात ओरडू लागतो तेव्हा बाकीच्या गटांचे पुढारी

'' थांबा, थांबा " म्हणायला लागतात.)

पुढारी बः अरे असं काय करताय ! अं ! ही आपली एकत्र ॲक्शन आहे की नाही ?

पुढारी डः होय पण ' ए एन टी यू ' नं त्यांच्या लोकांना काय सांगितलंय ? त्यांचं कोऑर्डिनेशन फक्त ' पी टी एम एन ' आणि ' वाय टी ओ टी ' शीच आहे, आमच्याशी नाही. सगळ्यांनी एकमेकांना ' झिंदाबाद ' म्हटलं पाहिजे. डब्ल्यू आय डब्ल्यू डब्ल्यू -- झिंदाबाद !

गट ड : डब्ल्यू आय डब्ल्यू डब्ल्यू -- झिंदाबाद !( बाकीचे " थांबा, थांबा " म्हणतात.)

पुढारी बः बरं, आपण काही जनरल घोषणा देऊ -- स्वतंत्र नावं नकोतच.

पुढारी क : हं, हे ठीक आहे.

गट ड : वुई वॉंट -- जस्टिस !

बाकीचेः थांबा, थांबा --

पुढारी डः अरे, थांबा रे !

सभासद डः आयला, पण ' वुई वॉंट जस्टिस ' म्हणायला काय हरकत आहे !

पुढारी डः होय की -- पण आपण संख्येनं अगदी कमी असूनही मान्य करायला लावलं की नाही त्यांना !

सभासद डः पण वुई वॉंट जस्टिस म्हटलं तर काय बिघडंतय ? ( दुसऱ्याला ) आयला, 'वुई वॉंट जस्टिस ' म्हटलं तर काय होतंय ?

पुढारी डः बरं, म्हणा --

सभासद डः ( दुसरा ) डब्ल्यू आय डब्ल्यू डब्ल्यू -- झिंदाबाद !

बाकीचेः थांबा, थांबा. हं, आता फक्त जनरल घोषणा द्यायच्या. हं --

पुढारी बः हम सब -- एक है !

पुढारी कः हमारी युनियन -- हमारी ताकद !

पुढारी अः हमसे जो टकरायेगा -- मिट्टीमे मिल जायेगा !

पुढारी डः वुई वॉंट -- जस्टिस !( या घोषणाना अर्थात सगळ्यांचा प्रतिसाद.)

एकजणः गलीगली में घूमे नाद --

बाकीचेः ए एन टी यू, पी टी एम एन, वाय टी ओ टी, डब्ल्यू आय डब्ल्यू डब्ल्यू -- झिंदाबाद !

( ही अवघड घोषणा देत जमाव जातो. १ आणि २ पाहत उभे. २ अर्थातच अस्थिर उभा.)

२ : इतकी अक्षरं कसली ही ?

१ : ती त्यांच्या युनियन्सची नावं आहेत.

२ : पण त्यांना न्याय तर एकच हवा आहे, मग नावं वेगवेगळी कशाला ?

१ : ते तुला नाही कळायचं !

२ : तुला कळलंय !

१ : होय.

२ : सांग बघू.

१ : नको. ते इतकं गुंतागुंतीचं आहे की समजावून सांगायचं म्हणजे मला कंटाळा येतो. शिवाय इतकं करून तुला कळेल की नाही ही शंकाच आहे !

२ : म्हणजे मी फक्त मला कळलेलं नाही असं म्हणणार आणि तू फक्त तुला कळलंय असं म्हणणार ! उपयोग काय त्याचा !

१ : नाही, तसं समजावून सांगायलाही हरकत नाही -- पण त्यातून पुन्हा तुझे आणखी काही उपप्रश्न निघत जाणार -- त्यांची उत्तरंही तशीच गुंतागुंतीची असणार -- संपणारच नाही कधी ते --

२ : पण इतका सगळा हा प्रचंड गुंता तुला समजलाय असं तू आत्मविश्वासानं सांगू शकतोस ? हे सगळं काय कायम तुझ्या डोळ्यांपुढं असतं की काय ? यातला थोडा गुंता कुठंतरी तू विसरला असलास तर ? आणि थोडा गुंता जरी विसरलास तरी बाकीच्या गुंत्याचा काहीच उपयोग नाही !

१ : तू मूर्ख आहेस !

२ : ( कुत्सितपणे ) तू शहाणा आहेस !

१ : बस, वाद नको !

२ : नको तर नको ! पण यातून मला एक मार्ग लक्षात यायला लागलाय --

१ : कोणता ?

२ : मैत्रीण नसलेल्या तरुणांची मी एक संघटना काढणार --' गर्ल-फ्रेंडलेस यूथ आर्गनायझेशन ऑफ इंडिया ' --.' जी वाय ओ आय ' ! काही लोक आपल्या स्वभावाच्या आणि आकर्षकपणाच्या जोरावर जास्त मैत्रिणी काबीज करतात , त्यामुळं बाकीच्या तरुणांना मैत्रिणी मिळत नाहीत ! प्रत्येकाला किमान एक मैत्रीण मिळालीच पाहिजे ! आयुष्यात स्थिरता येण्यासाठीच्या किमान गरजांपैकी ही एक प्राथमिक गरज आहे.

१ : अरे होय. पण मैत्रिणींचं वाटप कसं करणार ? त्या काही वस्तू नव्हेत. त्यांना स्वतःचे जीव असतात, भावना असतात, शिवाय त्यांचं त्यांचं स्वातंत्र्य असणार ! सक्ती कशी करणार तुम्ही ?

२ : प्रथम मागणी नीट मांडायची -- मार्ग कसा काढायचा ते नंतर बघू. निदान आजच्यापेक्षा परिस्थितीत थोडी तरी सुधारणा तरी होईलच !

१ : तुझ्यामुळं मला सतत अस्थिर राहावं लागतंय आणि विश्रांती मिळत नाहीय मला. बाकीच्या देशांनी जास्त डोंगर आणि जास्त रानं मिळवली म्हणजे बसा मग बोंबलत !

२ : हो -- पण ही मैत्रिणीची डिफिकल्टी तेवढीच महत्त्वाची आहे. फार दिवस मैत्रिणीशिवाय राहणं -- म्हणजे माणूस आत्महत्या करेल शेवटी ! आणि आप मरे तो डूब गई दुनिया ! कसले डोंगर आणि कसली रानं आणि कसला अरबी समुद्र !

१ : हे प्रश्न असे ना तसे आज ना उद्या सुटतील, पण देशानं एकदा जमीन गमावली की गमावली. देश मग एवढाच -- लहानच राहणार.

२ : एवढ्या मोठ्या देशाला लहान म्हणा ! छान !

१ : अरे पण तो जेवढा मोठा होऊ शकण्याची संधी आहे त्या मानानं लहानच राहणार की नाही ! उगीच वादासाठी वाद करून काय उपयोग !

( एक बावीसतेवीस वर्षांची तरुणी प्रवेश करते. थोडक्यात म्हणजे, ही एक संभाव्य मैत्रीण.)

मैत्रीणः इथं दोन नंबरचा माणूस कोण हो ?

१ : दोन नंबरचा पैसा असतो - दोन नंबरचा माणूस म्हणजे काय ?

मैत्रीणः तुम्ही बरंच नैतिक वगैरे बोलताय. शिवाय तुमचा सचोटी आणि प्रामाणिकपणावर विश्वास असून लाच-लुचपतीचा नायनाट करता येईल अशी तुमची श्रध्दा दिसते. म्हणजे फार तर तुम्ही एक नंबरचे माणूस असाल. म्हणजे मला हवा असलेला दोन नंबरचा माणूस हा दुसराच असणार--हा -- !

( दुसऱ्याला) काय हो, तुम्हीच ना ते ?

२ : कोण ?

मैत्रीणः ते अरबी समुद्राबद्दलचं प्रकरणवाले !

१ : माणसं बोलतात त्या वाक्यांचे अर्थ फक्त व्याकरणावर आधारित नसतात ! असो.

२ : होय -- नाही -- तो हा -- माझा मित्र नंबर एक.

मैत्रीणः ( १ ला ) अय्या ! किती साधे दिसता तुम्ही ! पण मोठा महत्त्वाचा भार तुम्ही पेलताहात याचं खरंच मोठं आकर्षण वाटलं मला. तुम्हाला एकदा तरी भेटायची खूप इच्छा होती माझी !

१ : ( हळू आवाजात, बाजूला २ ला ) बायका मूर्ख असतात आणि त्यांच्या मूर्खपणाला वाव मिळेल असं आपल्यातही थोडंफार काहीतरी असावं लागतं. पण मी तुझं काम करायचा प्रयत्न करतो.( उघडपणे ) हे बघा, माझ्या छोट्याशा कामाचं तुम्हाला कौतूक वाटलं याबद्दल मी तुमचा आभारी आहे. तर आता जाता जाता मी तुम्हाला एक विनंती करू इच्छितो --

मैत्रीणः काय मज्जा आहे ! हलताय किती तुम्ही दोघेही ! इतके का हलताय सारखे ?

१ : तशी हालचाल चालूच होती, पण तुम्ही आल्यावर हालचालींचा वेग आणि जोर जरा वाढलाय, इतकंच.

मैत्रीणः खरंच, पण अशी हालचाल अनुभवत राहणंसुध्दा किती थ्रिलिंग वाटतंय ! अक्षरशः रोमांचित होतेय मी !

१ : एक विनंती करू का ?

मैत्रीणः करा की -- काहीही करा -- भारावून गेलेय मी -- खरंच !

१ : हा नंबर दोन -- माझा मित्र.तो जरा मैत्रिणीच्या शोधात आहे. तर तुम्ही त्याची मैत्रीण व्हावं, अशी मला तुम्हाला विनंती करायची आहे.

मैत्रीणः अय्या ! असं सांगून का कधी कुणी कुणाची मैत्रीण होत असतं ? खरंच बाई, मजेदारच आहात तुम्ही ! बरं, ते झालं, पण ती अरबी समुद्राची काय भानगड आहे ? आणि तुमची काहीतरी खास योजना आहे

म्हणे ?

१ : योजना आहे, पण ती गुप्त ठेवणं आवश्यक आहे. बोभाटा व्हायला नकोय त्याचा. शिवाय तुम्ही स्त्री आहात !

मैत्रीणः बरोबर आहे तुमचं म्हणणं, पण आम्ही बायकाही काही बाबतीत खूप शहाण्या असतो. खऱ्या महत्त्वाच्या ज्या गुप्त गोष्टी असतात, त्या गुप्तच ठेवतो आम्ही. तुमचं सगळं मी गुप्त ठेवीन. पण खरंच याच्यात मला खूप इंटरेस्ट आहे.

१ : गंमत म्हणजे आमच्याबरोबर तुम्हीही नकळत हलायला लागला आहात.

मैत्रीणः मलाही अशीच मजा येतीय. बोला.

१ : तर मी एक वायू तयार करतो आहे. त्या वायूची प्रक्रिया केलेलं धान्य आम्ही काही ठराविक देशांना पुरवणार आहोत. तिथं घराघरांतून हे धान्य जेव्हा शिजवलं जाईल, तेव्हा निघणाऱ्या वाफेतून हा वायू बाहेर पडून तिथल्या हवेत मिसळेल. आणि त्या वायूमुळं तिथले लोक सारखे कंटाळून मरगळून झोपी जात राहतील -- ते असे झोपेत असताना आपण जास्त जमीन मिळवायची, अशी योजना आहे. आणि यात हिंसेचा अजिबात प्रश्न नाही.

मैत्रीणः अय्या ! माव्हर्लस ! किती सोपी आणि हुकुमी योजना आहे तुमची ! खरंच, तुम्ही काहीही करू शकाल !

१ : हा माझा मित्र दोन.

मैत्रीणः हं.

१ : कसा वाटतो ?

मैत्रीणः : ते बोलत नाहीत काहीच. नुसतेच हलतायत. नुसतं हलून काय उपयोग ?

२ : मी बोलतो. बोलायला तयार आहे मी .

१ : अरे इथं काय वाटाघाटी चालल्यायत असं समजतोस काय तू ?

२ : ( मैत्रिणीला ) तुम्ही छान दिसताय ! मला खूप आवडलात तुम्ही !

मैत्रीणः पण हे सांगताना चेहरा का टाकताय तुम्ही ? एखाद्या स्त्रीला सुंदर म्हणायचं तर एवढा कसला अपमान वाटतो तुम्हाला ?

१ : मी शब्दांपेक्षा कृतीवर जास्त भर देणारा माणूस आहे. माझ्या कृतीचा अनुभव न घेता माझ्या शब्दांवरून माझ्याबद्दल मत बनवू नका.

मैत्रीणः शब्द बोलणं ही कृती नाही समजत तुम्ही ? तुम्हाला मैत्रीण हवी असेल तर एकदम दुसरी कुठली कृती करणार तुम्ही ?

२ : मी तुमच्याकडे पाहून हसू शकेन. तुमच्याकडे एकटक पाहत राहू शकेन. नजरेनं तुम्हाला कवटाळून जवळ घेऊ शकेन.

१ : बापरे ! मी जातो आता. आलोच. काही काही प्रसंगांची आपल्याला भीती वाटते ! ( जायला निघतो --)

मैत्रीणः अहो थांबा ना ! असं काय ते ! मला तुमच्या मित्रांबरोबर बोलत ठेवून निघालात कुठं तुम्ही ?

१ : तुम्ही समजताय तसा नाहीय तो. कित्येक वर्षांत मैत्रीणच नसल्यानं असं बोलतोय तो.

२ : नाही, तू जा आणि जरा वेळानं ये. तुझ्यासमोर यांच्याशी नीट बोलता येत नाही मला !

१ : हं. आलोच ( जातो.)

मैत्रीणः अहो, अहो -- ( २ ला ) असं काय ते ! खरंच गेले ते --

२ : असू दे. थांबा जरा. आता मी तुम्हाला खिळवून ठेवणार आहे.

मैत्रीणः खिळवून ?

२ : होय. या अशा समोर.( स्वतःच तिच्या समोर येतो. तिच्या डोळ्यांत टक लावून पाहतो. ती अस्वस्थ होते. त्याच्यासारखीच अस्थिर होत जाते. त्याच्या अस्थिरपणात सामील होत जाते. जरा वेळ नाचवजा अस्थिर हालचाली...)

१ : ( जरा वेळाने येऊन ) हां -- हां -- हां -- चालू द्या -- आता असाच थोडा वेळ गेला की या अशा अस्थिरपणाची सवय होईल तिला -- आणि मग त्याशिवाय चैन पडणार नाही तिला -- थोडक्यात म्हणजे,
मित्रमैत्रीण व्हाल तुम्ही -- वा !

मैत्रीणः ( २ ला -- तशाच हालचालीत ) तुमचा तो शहाणा मित्र उगीचच बडबड करतोय -- मघाशी ते देश

मोठा होण्याचं एक सांगत होता ! अहो, सगळीकडं पसरलंय ते ! ते ऐकून तर मी आले इकडे -- म्हटलं, बघू तरी कोण वल्ली आहे ती !

२.	(आपल्यातच मश्गूल. ) आता स्थिर वाटतंय मला -- आता मला अजिबात अस्थिरता जाणवत नाहीय.

१ः	आपल्या अस्थिरतेत परलिंगी व्यक्ती सुसंगतपणे सामील झाली तर त्याच अस्थिरतेचं स्थिरतेत रूपांतर होतं -- थोडक्यात म्हणजे, लोक हो, आयुष्याला स्थैर्य येतं !

२ :	मला वाटलं होतं की मला काहीच जमणार नाही.

मैत्रीणः	हुं ! उगीच आपलं म्हणायचं !

२ :	मला वाटलं होतं की तू भिकारी समजशील मला, हेटाळणी करशील माझी !

( मैत्रीण चेहरा सस्मित करते.)

वाटलं होतं की, नुसतंच तुझ्या आठवणीत कुढत बसावं लागेल मला आयुष्यभर. वाटलं होतं --

( मैत्रीण त्याच्या ओठांवर बोट ठेवते.)

मैत्रीणः	काही नाही -- काही बोलायचं नाही आता. आणि बोलायचंच असलं तर ते नको -- आता काय, कसं वाटतंय ते बोलू या --

२ :	खूप समजुतदार आहेत तू !

१ :	( हसून ) कारण ती पण स्थिरावलीय ना !

मैत्रीणः :	हूं !

२ :	( १ कडे नुकतेच लक्ष गेल्याप्रमाणे ) अरे, आलास वाटतं तू !

१ :	तुला वाटलं होतं की -- की मी जाणारच नाही ! अं ? माझीही तुझ्या अस्थिरतेत फार काळ अडकून राह्यची इच्छा नव्हतीच !

२ः	अच्छा ! भेटू या मग -- ( मैत्रिणीला ) चल ! ( १ ला ) अच्छा !

१ :	अच्छा ! अच्छा ! बरंय हो मैत्रीणबाई !

मैत्रीणः	( जरा तुटकपणे ) हं, बरंय !

( २ आणि मैत्रीण जातात. १ एकदोन मिनिटे किरकोळ कवायत करून अंग मोकळे करून घेतो आणि निःश्वास टाकतो.)

१ :	समर्थाचिया सेवका वक्र पाहे ! असा सर्व भू --

( एवढ्यात जमावाचा ओरडा ऐकू यायला लागतो. कानोसा घेत राहतो. आवाज जवळ येतात." वुई वॉंट जस्टिस, वुई वॉंट जस्टिस " -- असे ओरडत बरेच लोक येतात.)

१ :	( त्यातल्या एकाला ) अहो, अहो, अहो, एक मिनिट -- वाजले किती हो ?

एकजण :	समजा, साडेपाच --

१ :	हं हं -- ( एकजण जायला लागलेला, पण परत येतो.)

एकजणः:	काय हो --

१ :	अं ?

एकजणः	एवढं विचारण्यासाठी मला मोर्चातून थांबवून अगदी इतकं असं विचारायची काय गरज होती ?

१ :	सॉरी ! झालं काय की मी विचारलं तेव्हा तुम्ही मोर्चात होता. सॉरी हं !

एकजणः	( चिडून ) म्हणजे मी मोर्चात असताना यांनी विचारलं असं नाही--यांनी विचारलं तेव्हा मी मोर्चात होतो ! ( जातो.)

१ :	( निश्वासून )म्हणजे समजा की, आता साडेपाच वाजलेले आहेत, माणसाच्या ऐतिहासिक प्रक्रियेतल्या कुठल्यातरी एका दिवसाचे संध्याकाळचे साडेपाच ! ' समजा, साडेपाच ' ! पण या एकूण ऐतिहासिक प्रक्रियेतल्या कुठल्यातरी एका क्षणी याच प्रक्रियेतल्या एका ॲक्शनमध्ये असलेल्या एका माणसाला मधे थांबवून हे विचारायची काय गरज होती ? बरोबर आहे. पण हाही त्याच ऐतिहासिक प्रक्रियेचा भाग नसेल कशावरून ? समजा, साडेपाच वाजले आहेत हे मला सांगण्यापेक्षा मोर्चातून अनडिस्टर्बड् पुढे जाता येणं हे त्या सदरहू गृहस्थाला अधिक महत्त्वाचं वाटावं हाही त्या प्रक्रियेचाच एक भाग असेल ! असेलही ! (मोठ्यांदा घोषणा देत --) लोक हो, ही ऐतिहासिक प्रक्रिया माणसांना शेवटी अशा जगात नेणार आहे की जिथे प्रश्नच नसतील ! ( हळू आवाजात ) कारण तोपर्यंत कदाचित माणसंही नसतील !( काही क्षण रिकामे...) ...पण ... पण आम्ही इतकी वाट पाहू शकणार आहोत का ? बरं, समजा, वाट

पाहण्याची आमची तयारी नाही, तर आत्ता या क्षणी आम्ही काय करू शकतो ? ( हसून ) याहून जास्त गंभीर विचार आपल्याला करता येणार नाही. किंवा याहून जास्त थिल्लर विचार आपल्याला करता येणार नाही असं म्हणू.( पुन्हा घोषणा देत ) गांभीर्य आणि थिल्लरपणा यांतला फरक आता संपलेला आहे.( सावकाशपणे) गांभीर्य आणि थिल्लरपणा एकच आहेत ! एकच ! ( इथे एक प्रखर व्यक्तिमत्त्वाचा माणूस प्रवेश करतो. याला कार्यकर्ता म्हणू. दिसायला विपन्न आणि डोळे तारवटलेले. हा माणूस येऊन मोठ्या आवाजात बोलू लागतो. तो बोलत असताना एखाद्या भयानक घटनेभोवती एकेक एकेक माणसे जमावी तसे हळूहळू लोक जमत जातात. डोळे विस्फारून ऐकत राहतात. या गर्दीत २ आणि मैत्रीणही आहेत.)

कार्यकर्ता: विनोद करतात भडवे ! विनोद ! भरल्यापोटी विनोद करणाऱ्या आणि -- स्त्रियांचे विचार डोक्यांत वागवणाऱ्या या हरामजाद्यांना माणसांचे खरे प्रश्न दिसतही नाहीत ! पोटातल्या अन्नानं नजरेवर झोप आलेली असते साल्यांच्या ! खाऊन खाऊन स्वप्नं बघतात साले, कविता लिहितात ! ( ओरडतो ) चार दिवस पोटात अन्नाचा कण न गेलेली माणसं कधी पाहिलीत का रे हरामखोरांनो ? पाहिलीत ? अन्नाविना, ओषधपाण्याविना गटारात तडफडत पडलेले मानवी जीव तुमचे कुणी नव्हेत का रे हलकटांनो ? देशाच्या आणि संस्कृतीच्या गप्पा सांगतात चोर ! तुमचा कुठला देश आणि कुठली संस्कृती आमच्या लहानग्या पोराला औषध देण्यासाठी चार आणे देते ? कुठला देश ? असले भिकारचोट देश आणि त्या देशाचे भक्त यांना 'या' च्यावर ठेवतो आम्ही ! स्वतःसाठी जे जे करता येईल ते करून देशासाठी केलं असं म्हणणारी माकडं पैशाला पासरी आहेत ! संस्कृती म्हणजे गटार नव्हे, होय रे भडव्यांनो ? गटारात डोकावून बघायला घाबरता होय रे ? का लाज वाटते ? अं ? तुमच्याच देशात वाहणारी ही गटारं कुणाची रे ? का तुमच्या संस्कृतीला लागलेलं हे नुसतं एक किरकोळ गालबोट ? अं ? तुमच्या आयाबहिणींवर दहादहा माणसं चढली तर कसं वाटेल रे ? तुळशीभोवती निरांजन घेऊन फेऱ्या मारणाऱ्या बायका दिसतात होय तुम्हाला ? पावित्र्य पाळायचं म्हणतात भडवे ! यांची बायको पवित्र राहिली की सगळं जग पवित्र वाटतं भडव्यांना ! कोरून मिशा काढून खुदूखुदू हसतात साले ! शिस्त पाळूया म्हणतात ! कायदा पाळूया म्हणतात ! हिंसा नको म्हणतात ! झाटांच्या आजूबाजूचे शब्द वापरायला नको म्हणतात ! प्रत्येकाला आपापली उन्नती करायची संधी आणि हक्क मिळालेला आहे म्हणतात ! सगळी दुनिया समजल्यासारखे मतं सांगतात हरामजादे ! मतं सांगायला भडवे सदोदित तयार ! ' विचारविनिमय करू या ' म्हणतात ! सनदशीर मार्ग ! ' चर्चा करू या ' म्हणतात ! यांचे खापरपणजोबाही चर्चा करत आले आणि हेही चर्चा करतायत ! बायकोजवळ झोपायचा प्रश्न असला तरी चर्चा करून ठरवतील साले ! ( एकदम भावविवश होत ) अरे का बंद होता असे ? ...अं ? इतक्या कोट्यवधी लोकांचे हे सर्वस्व हरवलेले डोळे तुम्हाला दिसत नाहीत ? ...नाहीत दिसत ? ...( हुंदके देऊ लागतो. लोक स्तिमित होऊन उभे. काहीजण अत्यंत भारावलेले . १ सावकाशपणे पुढे येतो.)

१ : ( सावकाशपणे ) शांत व्हा तुम्ही...अं...शांत व्हा...खरंच...( काही क्षणांनी कार्यकर्ता सावरतो. डोळे पुसतो.)

कार्यकर्ता: माफ करा...माफ करा...कुणालाही मुद्दाम दुखवायचं नव्हतं मला...पण...पण खरं आहे हे सगळं...असंच आहे हे...आणि आम्ही अशक्त आहोत ...दुबळे आहोत...काहीच करता येत नाहीय आम्हाला...काहीच करता येत नाहीय...पण...पण...एक दिवशी हीच दीनदुबळी कपाळकरंटी फाटकी किडकी जनता एका विचारानं पेटून उठेल आणि त्या लढ्याच्या तेजाबात जळून खाक होईल ही संस्कृती...ही खुजी किरटी रोगट संस्कृती...

१ : ( २ आणि मैत्रीण जायला निघालेले आहेत. त्यांना थांबवत ) थांबा, निघालात कुठं ? असह्य होतंय तुम्हाला हे सगळं ? तुम्हाला वाटतंय की तुमचे प्रश्न संपले ! स्त्रीला पुरुष मिळाला, पुरुषाला स्त्री मिळाली ! संपले प्रश्न ? आता थोड्याच दिवसांत तुमचं एकमेकांचं पटेनासं होईल, एकमेकांचा कंटाळा येईल तुम्हाला, जोखड वाटायला लागेल तुम्हाला तुमच्या नात्याचं ! प्रश्न नाहीत असं फक्त काही काळ वाटू शकतं आपल्याला, पण प्रश्न असतातच ! कुठल्याही वरवर नगण्य दिसणाऱ्या प्रश्नांच्या खड्ड्यात आहुती पडू शकते आपली. आपल्याला वाटतं, आता धोका नाही. पण धोका नसलेला एक क्षणही नसतो आयुष्यात. प्रत्येक क्षणात असंख्य प्रश्नांचे नाग फणे काढून दबा धरून असतात. कोणता क्षण कसा उलगडला जाईल हे कधीच सांगता येत नाही...

२ : असू दे -- पण आत्ता का डोक्याला ताप ? या क्षणी आम्ही जे आहोत ते काही संपूर्ण आम्ही घडवलेलं

नाही. आम्हीही दुबळे असू कदाचित -- पण आम्ही का म्हणून शिव्या खायच्या ? ज्याच्यात्याच्या आयुष्यातल्या ज्या त्या क्षणी ज्याचे त्याचे प्रश्न ज्याला त्याला खरे आणि सगळ्यात महत्त्वाचे वाटतात. म्हणून दुसऱ्यांबद्दल तुच्छता दाखवून काय उपयोग ? आम्हीही जिवंत आणि खरी माणसं आहोत !

कार्यकर्ता: असाल -- तुम्हीही खरे असाल, पण शेवटी मूलभूत महत्त्वाचे प्रश्नच फोफावून वर येतील आणि इतर सगळ्या किरकोळ प्रश्नांची फोलपटं इतस्ततः उडून जातील...ते प्रश्न महत्त्वाचे वाटणाऱ्या माणसांसकट...खऱ्याखोट्याचा निवाडा काळ करील...अटळपणे...( जायला लागत, १ समोर येऊन ) अटळपणे...( क्षणभर पाहून जातो.)

मैत्रीणः : ( काही क्षणांनी ) ते अरबी समुद्राचं कुठपर्यंत आलं हो ?

१ : समुद्र आत्तापर्यंत फक्त साडेसहा इंच मागे ओसरलेला आहे !

मैत्रीणः : ( अचंब्यांने ) एवढाच ? मग कधी व्हायचं ते सगळं ? हजारो किलोमीटरचं म्हणत होता की तुम्ही ?

१ : ते होणार आहेच सगळं. काळाच्या ओघात देश मोठा होणरच. अटळ आहे ते. जरा वाट पाहावी लागेल इतकंच. ( इतर माणसे आपसात कुजबुजत उभी.)

मैत्रीणः : बरं होईल बाई एकदाचं ते ! मज्जा आहे !

१ : सध्या फक्त वायू तयार करायचे प्रयोग चालू आहेत...

पण होईल ते...

' डोंगर रानं पाण्यात '

' पाणी डोंगर रानांत '

हं, म्हणा --

डोंगर रानं पाण्यात

पाणी डोंगर रानांत ...

( हळूहळू सगळे सामील होतात. मैत्रीणही सामील होते. तिच्या सांगण्यावरून २ ही सामील होतो. नाचत, फेर धरत झिंग येईस्तोवर या दोनच ओळी म्हणत राहतात. शेवटी दमल्यावर हसत हसत थांबतात.)

२ : मला वाटतं, सगळ्यांचे प्रश्न महत्त्वाचे आहेत असं धरून काहीतरी निघालं पाहिजे. सगळेच प्रश्न एकदम निकालात निघाले पाहिजेत. मागे असं घडलं, पुढे असं घडेल हे काही नको. आत्ता या क्षणी मोकळं होता आलं पाहिजे. अमुक जास्त महत्त्वाचं, तमुक कमी महत्त्वाचं असं असताच कामा नये...

मैत्रीणः : होय बाई ! माणसाच्या मनाला कुठल्याच प्रश्नाचा स्पर्शच नको व्हायला असं काहीतरी पाहिजे ! सगळी माणसांचीच मनं आहेत की नाहीत !( लोक हसायला लागतात. मैत्रीण आणि २ यांच्याकडे खुळ्या माणसांकडे बघावे तसे बघत हसत जातात.)

१ : प्रश्नहीन मनं ही आजच्या जगातली सगळ्यात हास्यास्पद कल्पना आहे. ती तुम्हा दोघांना सुचली आणि तुम्ही ती मांडलीत याबद्दल तुमचं त्रिवार अभिनंदन ! परंतु अर्थात याही कल्पनेची गरज नाकारता येणार नाही हे खरंच आहे. हजारो कल्पनांनी आज माणसाच्या मूलभूत गरजांची जागा घेतलेली आहे ! तुमचं हेही तत्त्वज्ञान एक मूलभूत गरज होऊ शकेल ! थोडं प्रचारकौशल्य आणि संघटनाकौशल्य वापरा ! जमून जाईल ! ( मोर्चा येतो.)

मोर्चा : वुई वॉंट -- जस्टिस ! वुई वॉंट -- जस्टिस ! ( घोषणा देत मोर्चा जातो.)

१ : न्याय ही जर हक्काची, हिताची आणि चांगली गोष्ट आहे, तर ती सगळ्यांना मिळालीच पाहिजे. न्याय देण्याचं कुणावर अवलंबून राहता कामा नये. तो आपोआप मिळालाच पाहिजे सगळ्यांना ! जगातले सगळे अन्याय बंद होणं म्हणजेच सगळ्यांना न्याय मिळणं ! यच्चयावत सगळ्या माणसांना न्याय ! ( मैत्रीण भारून पाहत उभी.)

२ : तू पुन्हा त्याच्याकडे आकर्षित व्हायला लागलीयस असं दिसतंय --

मैत्रिणः : मजेदार वाटतंय ! तो आपली टर उडवतोय की आपल्या बाजूनं बोलतोय तेच कळत नाहीय !

२ : तो टरच उडवतोय आपली ! फसू नकोस. फार धूर्त आहे तो. संपूर्ण खोटं बोलू - वागू शकतो तो. म्हणून त्याचा खोटेपणा कळून येत नाही.

१ : होय, खरं आहे. संपूर्ण खोटारडा आहे मी. ( मूडमधे जात ) कारण ' खरं ' म्हणजे काय ते मला कणभरही कळलेलं नाही...खरंच कळलेलं नाही...

( एवढ्यात " पूर्णानंदस्वामी की जय । ", "पूर्णानंदस्वामीकी जय !" असा घोष ऐकू येतो. लौकरच

पूर्णानंदस्वामी, त्यांचे एकदोन शिष्य आणि इतर भक्तगण येतात..)

स्वामीः : अंऽ...इथं थोडा वेळ मुक्काम करावा अशी आमची इच्छा आहे.

शिष्यः : ( एका भक्ताला ) इथं जरा थांबायचं म्हणतात --

भक्त : हरकत नाही, थांबू या की.( इतरांना ) स्वामीजी थांबू या म्हणतात जरा. हं, हं -- इथं -- इथं बसावं स्वामीजी. ( स्वामीजी बसतात. १, २ आणि मैत्रीणही हळूहळू सहज उत्सुकतेने त्या गर्दीत जातात. स्वामीजी एकदा " श्रीराम !" म्हणतात.)

भक्त : स्वामीजी, एक प्रश्न विचारायचा होता --

स्वामीजीः ( पाहतात. मग -- ) हं -- ?

भक्त : विचारू ?

शिष्य : विचारा.

भक्त : स्वामीजी, हल्ली ते अरबी समुद्राचं एक कानावर येतंय -- खरंच समुद्र ओसरून देश मोठा होणार आहे काय ? ( यावर स्वामीजी जरा वेळ मंद हसत राहतात. )

स्वामीजीः श्रीरामाची लीला अगाध आहे. 'होय' म्हटलं तरी विश्वास ठेवतात, 'नाही ' म्हटलं तरी विश्वास ठेवतात !

शिष्य : स्वामींच्या मते हा विशेष महत्त्वाचा प्रश्न नाही. तुम्ही स्वामींचे भक्त आहात हे ठीक आहे, पण देशभक्त या नात्यानं विचारलेल्या प्रश्नांना स्वामीजी उत्तरं देत नाहीत. एक प्रघात आहे !

भक्त : नाही, स्वामीजी खरं तेच सांगतात म्हणून विचारलं -- राहू दे हवं तर -- पण मला फार उत्सुकता होती याच्याबद्दल.

स्वामीजीः समुद्रापेक्षा आपण अनंत असतो. कारण ' समुद्र ' हा आपल्या मनातला एक कण असतो फक्त.

भक्त : हं, हे -- हे पटलं -- मला जवळजवळ उत्तर मिळाल्यासारखंच आहे --

मैत्रीण : मी -- मला एक विचारायचं आहे.

शिष्य : स्वामीजी, ही माता एक प्रश्न विचारते आहे.( स्वामी पाहतात.) हं, विचारा. विचारा.

मैत्रीण : माझ्या मनात एक प्रश्न आहे. कोणतं उत्तर स्वीकारून मी सुखी होईन ? पहिलं उत्तर स्वीकारून मी सुखी होईन की दुसरं ?

स्वामीजीः ( जरा वेळाने ) उत्तर स्वीकारायची ही तीव्र उत्सुकता बघून आमच्या डोळ्यांत पाणी आलेलं आहे. आणि आमचे डोळे महत्त्वाचे नाहीत हे आम्हाला माहीत आहे. आमचे डोळे ही एक क्षुल्लक बाब आहे. आम्हाला डोळे नसते तर आम्ही दुःखी झालोच नसतो असंही नाही.

शिष्य : माताजी, नाहकच आपण नको तो प्रश्न विचारलेला आहे !

मैत्रीण : पण हा माझ्या आयुष्याचा प्रश्न आहे !

शिष्य : आयुष्य नशिबावर अवलंबून असतं.

स्वामीजीः आपोआप घडणाऱ्या गोष्टींना आपण नशीब म्हणतो हे वाईट आहे. मुळापासून संपूर्णपणे आपल्याकडून कृती घडणं महत्त्वाचं आहे. आपण कोण ? ( काही क्षणांनी ) चला ! आम्हाला पाच मिनिटं विश्रांती हवी होती -- ती मिळाली. चलू या.

( उठतात. जातात. मागून अर्थातच शिष्य, भक्त जातात. जाताना काहीजण " मूर्ख बाई !", " नाहीतर काय ! ", "बाईनं अगदी मूर्खपणा केला !", " मुळात स्वामींना बायका समोर आलेल्या आवडत नाहीत !" -- अशी वाक्ये बोलत जातात. मैत्रीण, १ आणि २ उभे.)

मैत्रीण : माझं मी उत्तर पाहू शकते. रस्त्यावरच्या एखाद्या स्वामीची त्यासाठी मला गरज नाही. मी स्वतः समर्थ आहे. असले छप्पन स्वामी रस्तोरस्ती पडलेले असतात !

१ : होय, पण तू स्वतःहून प्रश्न विचारलास त्याला. तुलाच राहवलं नाही.

मैत्रीण : ( चिडून ) मी एक सहज मजा म्हणून विचारलं होतं. मी काही अगदी त्याच्या सांगण्याप्रमाणे वागणार नव्हतेच.

१ : पण तुझ्या इच्छेप्रमाणे त्याचं उत्तर आलं असतं तर तुला बरं वाटलं असतं, इतकंच.

मैत्रीण : ( स्वगत ) याचं हे खटऱ्याळ कुत्सित बोलणंसुध्दा आवडतंय मला, गुदगुल्या करतंय -- कशी काय मी या दुसऱ्याबरोबर गेले हे आश्चर्यच आहे ! पुरुष कसा, असं मधूनमधून मनाला लागणारं बोलणाराच पाहिजे. माझा अहंकार दुखवत मला आधीन करून घेत चाललाय हा. हीच निवड बरोबर आहे.( उघडपणे ) बरं ते जाऊ दे -- तुमच्या त्या समुद्रकार्यात सहभागी व्हायची इच्छा आहे माझी --

( एवढ्यात एक भक्त येतो. )

भक्त : माताजी --

मैत्रीण : ( पाहून,चिडून ) ' माताजी ' ? मी माताजी आहे ?

भक्त : ( घाबरून ) नाही, स्वामीजींचा फक्त एक निरोप सांगायला आलो होतो. जरा पुढं गेल्यावर ते म्हणाले की, कुणीतरी जाऊन त्या मातेला असं असं सांगून या. म्हणून मी आलो.

२ : ( अस्थिरपणेच ) काय म्हणाले ते ?

भक्त : ते म्हणाले की म्हणजे कुठलंही उत्तर स्वीकारलं तरी तुम्ही सुखी होऊ शकाल, पण फक्त सुखी होण्याच्या अंदाजानं आणि हेतूनं उत्तर स्वीकारता कामा नये. ते म्हणाले की सगळी उत्तरं बिनमहत्त्वाची असतात.

मैत्रीणः : ( संतापून ) मूर्ख आहे तुमचा स्वामी !

भक्त : अं ?

मैत्रीण : ' अं ' काय -- चालते व्हा !

भक्त : अं ? हो -- हो. ( जातो -- दोन क्षणांनी पुन्हा येऊन ) आणि ते म्हणाले की कुठल्याही भीतीबाबतची सगळी उत्तरं चुकीची असतात --( मैत्रीण संतापून पाहते, ते पाहून भक्त दचकून पळून जातो.)

२ : (अस्थिरपणे मैत्रिणीकडे येत ) सगळा मूर्खपणा आहे ! चल बघू, आपण या सगळ्या मूर्ख जगापासून दूर कुठेतरी जाऊ -- एकांतात -- जिथं सगळं जग फक्त आपलंच असेल --

मैत्रीण : ( तुटकपणे )-- पण मी आता कधीच तुझी नसेन -- तुझ्या अस्थिरपणाचं मला काही काळ थ्रिल वाटलं -- पण आता मला तुझा कंटाळा आलेला आहे --

२ : कंटाळा ? म्हणजे -- म्हणजे -- विचार काय आहे तुझा ?

मैत्रीण : मी आता याच्यावर भाळलेली आहे. आता देश मोठा होण्यात मला रस वाटतोय.

२ : माझा मित्र आहे तो -- तो -- तो असा विश्वासघात करणार नाही.

मैत्रीणः : पण तुझा मित्र असूनही तो चांगला असल्यामुळं माझं प्रेमही नाकारू शकणार नाही तो -- तसं केल्यामुळं मला किती दुःख होईल याची कल्पना करू शकेल तो -- ( १ जवळ येत ) होय की नाही ?

१ : ( तुटकपणे ) पण -- पण काय आहे की मला तुझं तितकंसं आकर्षण वाटत नाही -- नाहीतर ' माझ्या या मित्राची तू मैत्रीण हो' म्हणून विनंती कशाला करत बसलो असतो मी ? -- हेही म्हणजे लक्षात घ्यावं लागेल तुला.

मैत्रीण : म्हणजे -- म्हणजे -- तू --

१ : म्हणजे इतकंच की तशी आणि तितकी काही तू मला आवडू शकणार नाहीस !

मैत्रीण : मला -- मला सहन होणार नाही हे -- मी आत्महत्या करीन -- मी --

२ : आणि तू मला असं सोडून दिलंस तर मी आत्महत्या करीन त्याचं काय ?

१ : (जणू तटस्थपणे ) पण कोणत्याही परिस्थितीत मला आत्महत्या करता येणार नाही. समुद्र ओसरत चालला आहे. ( आता १ मैत्रीणीकडे पाठ करून उभा. मैत्रीण २ कडे पाठ करून उभी. २ मैत्रीणीच्या पाठीकडे पाहत अस्थिर आणि मैत्रीण १ च्या तुटक अविचल आकृतीकडे पाहत उभी..)

मैत्रीणः ( जवळजवळ रडू फुटत, १ ला ) ...ठीक आहे...ठीक आहे... मी...मेल्यावर निदान आठवण तरी ठेव माझी...की...होती एक अशीच कुणीतरी...तुझ्यावर जीव टाकणारी...

२ : ...आणि तूही ठेव लक्षात...की ...होता असाच एक कुणी...जीव टाकणारा तुझ्यावर ...

( इथं " वुई वॉट जस्टिस " " वुई वॉट जस्टिस " अशा घोषणा देत जमाव येतो. या तिघांच्या पार्श्वभूमीप्रमाणे घोषणा देत थांबतो. एखाद्या उंच इमारतीपुढे उभे राहून घोषणा देत राहिल्याप्रमाणे " वुई वॉट जस्टिस "-- ही एकच घोषणा जिवाच्या आकांताने देत राहतो. १ तटस्थ उभा. मैत्रीण आणि २ यांचा तसाच उभ्याने माइम चालू. घोषणांचा जोर वाढत जातो...)

...पडदा पडत जातो ...

**सूचना : सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. प्रयोगापूर्वी लेखी अनुमती घेणे आवश्यक आहे.**

पत्ता -चं.प्र.देशपांडे, ३, स्नेहदीप अपा.चिंतामणीनगर, सहकारनगर नं.२, पर्वती,
पुणे - ४११ ००९. **( दूरध्वनी - ४२२ ७८४७ )**